बुधवार, दि ४ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ११ वा ● किमंत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

### उद्या शपथविधी; मुख्यमंत्र्यांबाबत सस्पेंस कायम

## संभाव्य मंत्र्यांमध्ये जालन्यातून अर्जुनराव खोतकर यांचे नाव चर्चेत

**मुंबई -** राज्याचे मुख्यमंत्रीपद हे भाजपाकडे जाणार हे आता निश्चित झाले असून मुख्यमंत्रीपदी नेमकी कुणाची वर्णी लागणार हे अद्यापही स्पष्ट झाले नाही. भाजपाच्या विधीमंडळ पक्षनेता निवडीनंतरच मुख्यमंत्री कोण हे कळणार आहे. असे असले तरी तिन्ही पक्षातील काही संभाव्य मंत्र्यांची यादी समोर आली आहे. यात जालना विधानसभा मतदार संघातील शिवसेनेचे अर्जुनराव खोतकर यांचे नावही चर्चेत आहे.

अजित पवार हे उपमुख्यमंत्रिपद स्वीकारणार हे जवळपास निश्चित आहे. पण त्याचवेळी एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्रिपद स्वीकारणार की नाही याची स्पष्टता मात्र नाही. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला गृह, महसूल आणि सार्वजनिक बांधकाम खाते हवे असल्याची माहिती आहे.

शपथविधीला दोन दिवसांपेक्षाही कमी अवधी बाकी असताना राष्ट्रवादी काँग्रेस भाजप नेते आणि गृहमंत्री अमित शाहांकडे ११ मंत्रिपदाची मागणी करणार असल्याची माहिती आहे. राष्ट्रवादीला राज्य सरकारमध्ये ७ कॅबिनेट आणि २ राज्यमंत्री पदं हवी असल्याची सूत्रांची माहिती आहे. याशिवाय प्रफुल पटेलांसाठी केंद्र सरकारमध्ये एक कॅबिनेट पद, तसंच पक्षातील वरिष्ठ नेत्यासाठी राज्यपाल पदाचीही राष्ट्रवादीची मागणी असल्याचं विश्वसनीय सूत्रांनी सांगितलंय.

**शिवसेना संभाव्य मंत्र्यांची नावे**

एकनाथ शिंदे, दादा भुसे, शंभूराज देसाई, गुलाबराव पाटील, अर्जुन खोतकर, संजय राठोड, उदय सामंत

**भाजपचे संभाव्य मंत्री**

रविंद्र चव्हाण, नितेश राणे, गणेश नाईक, मंगलप्रभात लोढा, आशिष शेलार, राहुल नार्वेकर, अतुल भातखळकर, शिवेंद्रसिंहराजे भोसले, गोपीचंद पडळकर, माधुरी मिसाळ, राधाकृष्ण विखे पाटील, चंद्रशेखर बावनकुळे, संजय कुटे, गिरीश महाजन, जयकुमार रावल, पंकजा मुंडे, अतुल सावे,

**राष्ट्रवादी संभाव्य मंत्री यादी**

अजित पवार, आदिती तटकरे, छगन भुजबळ, दत्ता भरणे, धनंजय मुंडे, अनिल भाईदास पाटील, नरहरी झिरवळ, संजय बनसोडे, इंद्रनील नाईक, संग्राम जगताप, सुनिल शेळके, हसन मुश्रीफ

### जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांचे आदेश जारी

## जिल्ह्यातील टंचाईग्रस्त ६८ गावात पाणी उपसा करण्यास बंदी

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र भूजल पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी विनिमय अधिनियम-२००९ अन्वये वरिष्ठ भूवैज्ञानिकांनी जिल्ह्यातील संभाव्य पाणी टंचाई भासणाऱ्या गावांचा अहवाल सादर केला असून त्यात जिल्ह्यातील एकुण ६८ गावे टंचाईग्रस्त दर्शविली आहेत. तरी जालना जिल्ह्यातील टंचाईग्रस्त ६८ गावात ३१ जुलै २०२५ पर्यंत सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या उदभवावर प्रतिकुल परिणाम करणाऱ्या विहिरीमधील पाणी उपसा करण्यास बंदी घालण्यात आली आहे, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत.

जालना जिल्ह्यातील ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४ पर्यंत टंचाई भासणारी गावे जालना तालुक्यातील गणेशपूर, नाव्हा, सोमनाथ, वरुड तर परतूर तालुक्यातील चांगतपुरी, गोळेगाव, कनकवडी, लोणी खु, सातारा वाहेगाव, सावंगी गंगा किनारा, आणि सावरगाव बु. एकुण ११ गावांचा टंचाई भासणाऱ्या गावांचा समावेश आहे. जानेवारी ते मार्च २०२५ या कालावधीत अंबड तालुक्यातील अंतरवाला अवा, अवा, बदापूर, चिकनगाव, देशगव्हाण, माहेर भायगाव, बदनापूर तालुक्यातील बाजार वाहेगाव, नानेगाव, वाकुळणी, माळेगाव खु, भोकरदन तालुक्यातील बोरगाव तारु, हसनाबाद, टाकळी बाजड, आणि जाफ्राबाद तालुक्यातील देऊळगाव उगले, कुंभारी, मेरखेडा, वरखेडा भालकी, कुंभारझरी तसेच निवडूंगा या एकुण १९ गावांचा टंचाई भासणाऱ्या गावांचा समावेश आहे.



एप्रिल ते जून २०२५ या कालावधीत अंबड तालुक्यातील डोमलगाव, रामगव्हाण बु, टाका, वडीगोद्री, बदनापूर तालुक्यातील बावणेपांगरी, डावरगाव, तळणी लोधेवाडी, देवगाव, कडेगाव, कस्तुरवाडी, कुसळी, रोशनगाव , वरुडी, भोकरदन तालुक्यातील देऊळगाव ताड, खडकी, लतीफपुर, टाकळी हिवर्डी, तळेगाव, जाफ्राबाद तालुक्यातील खानापुर, नांदखेडा, वरखेडा फिरंगी, जालना तालुक्यातील भाटेपुरी, खणेपुरी, लोंढ्याची वाडी, मजरेवाडी, साळेगाव जालना, गवळी पोखरी, नंदापूर, थार, पोखरी सिंदखेड, वाघ्रुळ जहांगिर आणि मंठा तालुक्यातील देवठाणा उस्वद, इंचा कानडी आणि टाकळखेपा अशा एकुण ३८ गावांचा टंचाई भासणाऱ्या गावांचा समावेश आहे. आदेशाचा भंग केल्यास महाराष्ट्र भूजल अधिनियम-२००९ मधील तरतुदीनूसार योग्य ती दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार वापरण्यासाठी संबंधित उपविभागीय अधिकारी व संबंधित तहसीलदारांना आदेशाद्वारे प्राधिकृत करण्यात आले आहे. तरी टंचाईग्रस्त गावात भूजल अधिनियम-२००९ नुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

### ज्यैते ...

घवघवीत रे विजय
उदंड झालेत ज्येते
विरोधी बाकावरती
राहिले अत्यल्प नेते
घवघवीत यश येता
काम झाले हो फत्ते
बदलाव तर होणार
वेगळे रूप घेई सत्ते
प्रत्येकाचा हट्टाहास
मलाही मिळो खाते
कसे करी समाधान
सारे आपले चाहते
कुणास कसे काटावे
चालतात अड कित्ते
काय कारण द्यायचे
प्रश्न पडले बुध्दीमत्ते
नशेत चढू पाहे पहा
बंद असूनि  का गुत्ते
चाणाक्षनजरेने फिरे
शिकार शोधत चित्ते
कुणीही असो कसेही
गिरवतो तसेचं कित्ते
किती विचीत्र तू सत्ते
वाकवतेस बुध्दीमत्ते

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## दुभाजकाचे तात्काळ काम करा अन्यथा बेशरमाची झाडे लावून आंदोलन - दिनकर घेवंदे

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील गांधी चमन ते रेल्वे स्टेशन या मार्गावर नवीन रस्त्याचे काम पूर्ण झाले असून या रस्त्याच्या मधोमध विद्युत खांब आलेले आहेत. कित्येक महिन्यापासून हे खांब रस्त्याच्या मधोमध असल्याने वाहनधारकांमध्ये अपघात होत आहेत. तसेच दुभाजक चे काम न केल्यामुळे दोन्ही रस्त्याच्या मधोमध मोकळी जागा सुटलेली आहे. त्यामध्ये सुद्धा नेहमी अपघात होत आहेत, या रस्त्यावर वाहनधारकांची वर्दळ असल्याने आपण तात्काळ रखडलेले काम पूर्ण करावे नसता बेशरमाचे झाडे लावून महानगरपालिकेच्या विरोधात आंदोलन करण्यात येईल, असा इशारा परिवर्तन असंघटित कामगार संघाचे संस्थापक अध्यक्ष दिनकर घेवंदे यांनी मनपा आयुक्त संतोष खांडेकर यांना दि.0३ मंगळवार रोजी निवेदनाद्वारे दिला आहे. दिलेल्या निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, आपण स्वतः अभियंता सय्यद सऊथ यांच्याशी याविषयी चर्चा केली होती, पंधरा दिवसांमध्ये सदरील काम पूर्ण होईल असे आश्वासन त्यांनी दिले होते. परंतु दोन महिने उलटूनही अद्याप पर्यंत काम न झाल्यामुळे आपण स्वतः याकडे लक्ष देऊन सदरील काम पूर्णत्वास न्यावे,असे दिनकर घेवंदे यांनी मनपा आयुक्त यांना लेखी निवेदन दिले.




## अनाधिकृत फलक, होर्डिंग व पोस्टर्सवर दंडासह फौजदारी कारवाई करणार - शहर मनपा आयुक्त

**जालना । प्रतिनिधी -** अनाधिकृत फलक, होर्डिंग व पोस्टर्सवर जालना शहर मनपाच्यावतीने कारवाई करण्यात येणार असल्याचे शहर मनपा आयुक्त संतोष खांडेकर यांनी एक प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे. दंड वसूल करण्यासह फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचेही आयुक्तांनी स्पष्ट केले आहे.

जालना शहर मनपाच्यावतीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, राज्यातील अनाधिकृत जाहीराती घोषणा फलक, होर्डीग व पोस्टर्स बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र. १५५/२०११ मे. सुस्वराज्य फाऊंडेशन सातारा आणि इतर विरूध्द महाराष्ट्र राज्य आणि इतर या याचिकेवरील सुनावणीमध्ये मा. उच्च्च न्यायालयाने दिनांक ३१/0१/२०1७ रोजी विस्तृत निकाल दिलेला आहे. तसेच या प्रकरणात मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी वेळोवळी दिनांक ०९/१०/२०२४ व दिनांक १८/११/२०२४ रोजी अनाधिकृत फलक, होडींग व पोस्टर्स विरोधात कार्यवाही करणे बाबत आदेश पारीत करण्यात आलेले आहेत.

जालना शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरीक / व्यवसायिक / एजन्सीधारक यांना याद्वारे सुचित करण्यात येत आहे की, जालना शहर महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय तसेच जालना शहर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या जागे व्यतिरीक्त शहरात इतर कोणत्याही ठिकाणी विना परवाना जाहीरात फलक, होडींग व पोस्टर्स, बॅनर्स इत्यादी लावण्यात येऊ नये. तसे आढळल्यास संबंधिताविरूध्द दंड आकारून मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ तसेच महाराष्ट्र मालमत्तेच्या विरूपणास प्रतिबंध करण्याकरीता अधिनियम, १९९५ अन्वये फौजदारी स्वरूपाची कार्यवाही करण्यात येणार आहे.

### 'त्या' कोचिंग क्लासेसवाल्यांकडुन मनपा दंड वसुल करणार का?

शहरातील मंठा चौफुली ते गुरुबचन चौक दरम्यान विद्युत खांबांवर विना परवानगी लावण्यात आलेले फलक तसेच बॅनर्स हे त्याच परिसरात असलेल्या कोचिंग क्लासेसचे असून या कोचिंग क्लासेसवाल्यांकडून मनपा दंड वसुल करुन फौजदारी कारवाई करणार का? असा प्रश्न निर्माण होत आहे. यासंदर्भात युवा आदर्शने वेळोवेळी अनाधिकृत फलक, होर्डिंग, बॅनर्ससंदर्भाने वृत्त प्रकाशित केलेले आहेत. मात्र, त्यावेळी केवळ कारवाईचे सोंग करत शहर मनपाकडुन थोडे फार बॅनर्स, होर्डिंग हटविण्यात आले होते. आता खुद्द आयुक्तांनीच आवाहन केले असल्याने येत्या दिवसात मनपा काय कारवाई करते याकडे जालनेकरांचे लक्ष लागून आहे.

युवा आदर्श | जालना | बुधवार, दि ४ डिसेंबर २०२४ | E-mail- yuva.aadarsh@gmail.com



# संपादकीय

## भारतीय नौदल

भारतीय नौदलातर्फे दरवर्षी ४ डिसेंबर हा दिवस भारतीय नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. त्याआधीचा पूर्ण सप्ताह हा देशभरात नौदल सप्ताह म्हणून साजरा केला जातो. ४ डिसेंबर याच दिवशी नौदलदिन का साजरा केला जातो हे जाणून घेऊया. १९७१ सालच्या सुरवातीपासूनच भारत आणि पाकिस्तानमध्ये कमालीचा तणाव निर्माण झाला होता. तत्कालीन पूर्व पाकिस्तान मधून पाकिस्तानी हवाईदल सातत्याने भारतीय हद्दीत घुसखोरी करत होते. भारताने अनेकदा इशारे देऊनही पाकिस्तान आपली खोड मोडायला तयार नव्हते. १९७१ च्या एप्रिल महिन्याच्या सुमारासच युद्ध पुकारण्यासदृश परिस्थिती निर्माण झाली होती. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या पार्श्वभूमीवर सैन्य दलांच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलावली या बैठकीला मंत्रिमंडळातील सर्व सदस्य उपस्थित होते. लष्करप्रमुख सॅम माणेकशॉ यांनी या बैठकीत स्पष्ट सांगितले की सध्याची परिस्थिती आणि ऋतू हे आपल्यासाठी अनुकूल नसल्याने सध्यस्थितीत युद्ध आपल्याला परवडणारे नाही. युद्धासाठी नोव्हेंबर पर्यंत थांबावे लागेल. नोव्हेंबर पर्यंत सैन्याची जुळवाजुळव व्यवस्थित करता येईल याची खात्री देण्यासही ते विसरले नाही. खरंतर एप्रिलमध्येच युद्ध व्हावे या मताच्या इंदिरा गांधी होत्या पण लष्करप्रमुखांनी परिस्थिती विषद केल्यानंतर नोव्हेंबर पर्यंत थांबण्याचा निर्णय पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाने घेतला. त्यामुळे आपण काहीही केले तरी भारत आपल्याला उलट उत्तर देऊ शकणार नाही अशा आविर्भावात पाकिस्तान वावरू लागला. त्यांनी ३ डिसेंबर रोजी भारतीय सीमाभागावर पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानातून जोरदार हल्ले चढवले. त्याचवेळी भारतीय विमानवाहक युद्धनौका आयएनएस विक्रांतला सागरतळात बुडवण्याची योजना पाकिस्तानने आखली. पाकिस्तानची ही योजना भारतीय नौदलाच्या लक्षात आल्याने भारतीय नौदलाने चुकीचा संदेश पाठवून पीएनएस गाझी ची दिशाभूल केली आणि डाव साधला. भारतीय नौदलाने चढवलेल्या हल्ल्यात गाझी या पाकिस्तानच्या पाणबुडीला जलसमाधी मिळाली. भारताच्या आयएनएस विक्रांतला सागर तळाशी पाठवण्याची स्वप्ने पाहणाऱ्या पाकिस्तानी नौदलाची सर्वात शक्तिशाली असलेली गाझी ही पाणबुडीच सागर तळाशी पोहचल्याने पाकिस्तानला मोठा धक्का बसला. गाझी पाणबुडीला जलसमाधी मिळाल्यानंतर बंगालच्या उपसागरात आयएनएस विक्रांतने आपला दरारा पसरवला आणि पाकिस्तानी नौदलाचे कंबरडे मोडून काढले. आयएनएस विक्रांतवरील धावपट्टीचा वापर करत नौदलाच्या लढाऊ विमानांनी हल्ला चढवून पूर्वेकडे पाकिस्तानला डोकेही वर काढू दिले नाही. हे सुरू असतानाच पश्चिमी मुख्यालयाच्या नौदल ताफ्याने धाडसी नियोजन करुन लहान आकाराच्या नौकांच्या मदतीने छुप्या पद्धतीने पाकिस्तानी सागरी हद्दीत प्रवेश करत थेट कराची बंदरावरच हल्ला चढवला. पाकिस्तानी युद्धनौका, पाणबुड्या त्यांच्यावरील या अचानक झालेल्या हल्ल्याने हादरुन गेल्या. कराची बंदरावर थेट हल्ला होऊ शकतो, याची कल्पनाच पाकिस्तानी नौदलाने केली नव्हती. ३ व ४ डिसेंबरच्या मध्यरात्री भारतीय नौदलाने केलेल्या या हल्ल्याने पाकिस्तानचे कंबरडे मोडले आणि युद्धाचे पारडे भारताच्या बाजूने झुकले. त्यानंतर दहा दिवसांतच पाकिस्तानने शरणागती पत्करली. नौदलाच्या या पराक्रमाची आठवण म्हणून ४ डिसेंबर हा दिवस नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानंतर भारतीय नौदलाचा जगभरात दबदबा निर्माण झाला. अरबी समुद्र, बंगालचा उपसागर आणि दक्षिण महासागरात भारतीय नौदलाचे सामर्थ्य निर्माण झाले. आज भारतीय नौदल हे जगातील सर्वाधिक शक्तिशाली नौदल म्हणून ओळखले जाते. आज भारताचे नौदल हे जगातील पाचव्या क्रमांकाचे नौदल आहे. भारतीय नौदलाकडे एकूण ५५ युद्धनौका आणि ५८ हजार ३५० सैनिक आहेत. भारताकडे ९ विध्वंसक, १५ नौका, न्यूक्लिअर हल्ला करणारी एक पाणबुडी, १४ पारंपरिक पाणबुडीसह आधुनिक शस्त्रे आहेत म्हणूनच जगातील सर्वात शक्तिशाली नौदलामध्ये भारतीय नौदलाची गणना होते. भारतीय नौदलाला नौदल दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**श्याम बसप्पा ठाणेदार, पुणे, ९९२२५४६२९५**

# स्वामी गोविंददेव गिरिजी आणि सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांची 'सनातन आश्रमा'त हृदय भेट!



सनातन संस्थेच्या आश्रमात येऊन, या पुण्यभूमीत उपस्थित राहून त्याचे पूर्णपणे अवलोकन केल्यावर मला अत्यंत आनंद झाला. केवळ गोवाच नाही, तर आजूबाजूच्या प्रदेशांनाही 'तपोभूमी' बनवण्यात 'सनातन आश्रमा'चे मोठे योगदान आहे. या आश्रमातील उर्जेमुळे लोकांच्या मनोभूमिकेत गेल्या २५ वर्षांमध्ये जे बदल झाले आहेत, ते आपण अनुभवत आहोत. आता ही ऊर्जा अधिक वेगाने कार्य करत आहे, हेही जाणवते. म्हणूनच मला विश्वास आहे की, येत्या काही काळात आपला भारत देश संपूर्ण जगात सर्वोच्च स्थानावर पोहोचेल आणि या कार्यात या 'सनातन आश्रमा'चे सर्वांत मोठे योगदान असेल, असे गौरवोद्गार 'श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासा'चे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरिजी यांनी गोवा येथील सनातन संस्थेच्या आश्रमाला भेट दिल्यावर काढले.

या प्रसंगी सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले आणि प.पू. स्वामी गोविंददेव गिरिजी यांची सनातन आश्रमात हृद्य भावभेट झाली. सनातन आश्रमाच्या भेटीनंतर बोलतांना प.पू. स्वामीजी पुढे म्हणाले की, आपण भारताला पूर्वीसारखे महान राष्ट्र बनवू इच्छितो; मात्र भारत विश्वगुरूच्या स्थानावर सहज पोहोचणार नाही. यासाठी कुठेतरी उर्जेचा प्रवाह आवश्यक आहे. जसे मुंबईच्या भाभा अणुऊर्जा केंद्रातून ऊर्जा निर्माण होते आणि ती ऊर्जा आपण सर्वत्र वापरतो, तसेच हा 'सनातन आश्रम' आध्यात्मिक ऊर्जा निर्माण करत आहे. ही ऊर्जा आसमंतात पसरून लोकांच्या मनोभूमिका प्रभावित करत हिंदू राष्ट्राच्या निर्माणासाठी कार्य करत आहे.

जसे विविध महात्म्यांनी विविध ठिकाणी तपश्चर्या केली आहे, त्याचा प्रभाव वेळोवेळी धर्माला जागृत करून तो भारताला विश्वकल्याणासाठी समर्थ बनवतो. तसेच या राष्ट्राला सामर्थ्य देणार्या उर्जेचा केंद्रबिंदू हा सनातन आश्रम आहे. या केंद्राला मी अत्यंत आदरपूर्वक नमन करतो. या उर्जेच्या मूळ प्रवाह पूजनीय डॉ. जयंत आठवले यांच्या दर्शनातून आला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने मला अत्यंत आनंदित आणि प्रभावित केले आहे. मी त्यांना सुद्धा अत्यंत श्रद्धेने वंदन करतो. मी सर्वांना गीता शिकवतो. ती गीता सनातन आश्रमात आचरणात आणली जाते, असे पाहायला मिळाले. छत्रपती शिवाजी महाराजांचे नियोजन कौशल्य हे 'मायक्रो मॅनेजमेंट' (सूक्ष्म-व्यवस्थापन) होते, तसेच सनातन आश्रमाचे 'मायक्रो मॅनेजमेंट' शिकण्यासारखे आहे, असेही स्वामीजी म्हणाले.

# राजधानीचा स्मार्टनेस कुठं गुदमरलाय

दिल्लीतील प्रदूषणाने निर्माण झालेल्या जीवन-मरणाच्या परिस्थितीत नेमकं काय करावं, हा प्रश्न पडला आहे. दिल्ली सोडून जावं तर कुठं जावं? पोटापाण्याचं काय? मुलांच्या शिक्षणाचं काय? आणि सध्याची ही स्थिती बदलायला किती वर्षे लागतील? या दूषित वातावरणात राजधानीचा स्मार्टनेस कुठं गुदमरलाय अन् दिलदार दिल्लीचं 'दिल' कुठं हरवलंय, तेच कळत नाही. गेल्या पंधरवड्यात एका बाजूला 'महा'राष्ट्रात निवडणुकांचा 'महा'धुरळा उडत होता, तर दुसरीकडे दिल्लीत प्रदूषणाचा 'महा'कहर सुरू झाला. भारताची राजधानी दिल्ली. इथं देशाचे सगळे महत्त्वाचे निर्णय होतात. पंतप्रधानांच्या कार्यालयासह सर्व मंत्रालये इथे आहेत. देशाचे आर्थिक अंदाजपत्रक इथेच तयार होते. सगळ्या योजनांना आकार देणारा, त्यासाठीचे निर्णय घेणारा नीती आयोग प्रत्येक प्रश्नाचा तपशीलवार अभ्यास करुन धोरणांचा गोषवारा इथेच ठरवतो. देशातील विविध प्रश्नांवर आलेल्या घटनात्मक पेचांवर विचारविमर्श करणारे सर्वोच्च न्यायालय इथेच आहे. शिवाय, देशाच्या प्रगतीसाठी कायदेकानून बनवणारी संसदही इथेच आहे. या पार्श्वभूमीवर दिल्लीच्या प्रदूषणाच्या गंभीर प्रश्नावर गेली कित्येक वर्षे उपाय का निघत नाही, हा सर्वसामान्यांना पडणारा प्रश्न आहे.

'नेमेचि येतो मग पावसाळा' या उक्तीप्रमाणे 'नेहमीच असते इथे प्रदूषण' अशी या प्रदूषणाची आम्हा सर्वांना सवय झाली आहे. पण, या प्रदूषणाच्या गंभीर प्रश्नामुळे संपूर्ण दिल्ली आणि आसपासच्या भागात राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांचा विचार केला तर संताप आल्याशिवाय राहात नाही. जगातील पहिल्या १५ अत्याधिक प्रदूषित शहरांमध्ये भारतातील किती शहरे असतील? अशी १२ शहरे आहेत. 'आयक्यू एअर' या स्विस संस्थेची २०२३ ची आकडेवारी पाहिली, तर आपली मान लज्जेने खाली जाते. दिल्ली सर्व प्रदूषित शहरांमध्ये तिसऱ्या क्रमांकावर, तर नवी दिल्ली सहाव्या क्रमांकावर आहे. ही आकडेवारी आणखी तपशिलात जाऊन पाहिली, तर पहिल्या ५० शहरांमधील ४२ शहरे भारतातील आहेत. जगातील अतिप्रदूषित देशांमध्ये भारताचा क्रमांक खूप वरचा आहे.

पण, वास्तविकता अशी आहे की, कोणाला दोष द्यावा हेही कळत नाही. दिल्लीतील प्रदूषणाविषयी दरवर्षी होते तीच कंटाळवाणी आणि निष्फळ चर्चा सध्या सुरू आहे. एकदा नोव्हेंबर आला, थंडी पडू लागली की ही चर्चा सुरू होते. दिवाळीच्या आधी चिनी फटाक्यांवर निर्बंध घालण्याचा आणि दिवाळीच्या दिवसांत फटाके उडवण्यावर बंदी घालण्याचा न्यायालयाचा आदेश येतो. प्रमाण कमी झाले असले, तरी फटाके वाजतात म्हणजे वाजतातच. भारतीयांची मानसिकता समजणे अवघड आहे. शासनाचा आदेश, पोलिसांची देखरेख, न्यायालयाचा निर्णय, सरकारचे पूर्ण पानांचे वृत्तपत्रीय आवाहन आणि 'हे सर्व दंडनीय अपराध आहेत,' अशी सावधानीची सूचना असूनही लोक फटाके कुठून आणतात आणि कसे उडवतात, हेच कळत नाही. पुढे लग्नाचा मोसम येतो आणि फटाके उडतच राहतात. प्रदूषणाबरोबरच या सर्वांचा ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती, गर्भवती स्त्रिया, परीक्षार्थी विद्यार्थी यांच्यावर होणाऱ्या परिणामांचा कुणीच कसा विचार करत नाही? आपण सगळे इतके बधीर आणि असंवेदनशील कसे झालो आहोत? दिल्लीच्या प्रदूषणाला कारणीभूत घटक कोणते आहेत? औद्योगिक प्रदूषण, कचरा, वाहतुकीचे दुष्परिणाम, घरांमधील धुराने होणारे प्रदूषण, पाचोळा जाळणे आणि डिझेल जनरेटर्स आदी गोष्टी या समस्येच्या मुळाशी आहेत. आजकाल दिल्लीचा एक्यूआय ३०० - ४०० असा माणसाच्या आणि प्राणी-पक्षी या सर्वांच्या जिवाला धोकादायक आहे. दीड कोटीच्या वर वाहने असलेल्या या शहरात दिवसागणिक नवी वाहने वाढताहेत. दरवर्षी प्रदूषणाचे विक्रम मोडणारे असे शहर म्हणजे दिल्ली.

दिल्ली सरकार, केंद्र सरकार, प्रदूषण नियंत्रण विभाग, दिल्ली जल बोर्ड, दिल्ली महापालिका अशा अनेक संस्था या परिस्थितीला जबाबदार आहेत. राष्ट्रीय हरित प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, मानवाधिकार आयोग या सर्व संस्था सातत्याने परिस्थितीवर नजर ठेऊन असतात. दरवर्षी दिल्ली शासनाबरोबरच हरियाणा, पंजाब आणि उत्तर प्रदेश यांचे प्रशासन परिस्थिती सुधारत असल्याबद्दल आणि आपण करत असलेल्या कार्यवाहीबाबत प्रतिज्ञापत्र सादर करतात. पण, प्रत्यक्षात परिणाम शून्य! जनतेच्या सहनशीलतेचा आता अंत झालेला असला, तरी असहाय्य जनता हूं की चूं करत नाही.

आता पुन्हा एकदा दिल्लीच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू होईल. जाहीरनामे, प्रचार-प्रसार, उंच आवाजातील भाषणे, आश्वासने, पोस्टरबाजी या सर्वांचा पाऊस पडेल. सर्वपक्षीय नेतेच नव्हे, तर जनताही त्यात स्वतःला सुखनैव वाहवून घेईल. राजधानी क्षेत्राच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आपणच काम करतो आहोत, असा आभास तयार करण्याच्या नादात आमच्या सर्वांचे श्वास-उच्छ्वास बंद करु पाहणाऱ्या प्रदूषणाचा सगळ्यांना विसर पडेल. विचार करणाऱ्या व्यक्तींना मात्र या जीवन-मरणाच्या परिस्थितीत नेमकं काय करावं, हा प्रश्न पडला आहे. दिल्ली सोडून जावं तर कुठं जावं? पोटापाण्याचं काय? मुलांच्या शिक्षणाचं काय? प्रदूषणमुक्त अशी किती शहरे आहेत? आणि सध्याची ही स्थिती बदलायला किती वर्षे लागतील? नव्या दिल्लीतील नागरी सुविधा दिल्लीच्या इतर भागात नाहीत. पाण्याचा अनियमित पुरवठा, पादचारी मार्गांचा अभाव किंवा तुटलेल्या फरशा, अधूनमधून कचऱ्याचे ढीग, कागद आणि प्लास्टिकचे तुकडे... या एकूणच दूषित वातावरणात राजधानीचा स्मार्टनेस कुठं गुदमरलाय अन् दिलदार दिल्लीचं 'दिल' कुठं हरवलंय, तेच कळत नाही.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या कार्याध्यक्ष पदी रामहरी राऊत तर सचिव पदी प्रथमेश पाटील, माऊली धुळगंडे यांची नियुक्ती



**मुंबई । प्रतिनिधी -** राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व माध्यमातून रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा हे ब्रीद वाक्य घेऊन महाराष्ट्रभर कार्यरत असलेल्या शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष,या कक्षाचे मूळ संकल्पना तथा मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रमुख,मुख्यमंत्री विशेष कार्य अधिकारी मंगेश चिवटे यांनी शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या कार्याध्यक्ष पदी रामहरी राऊत तर सचिव पदी प्रथमेश पाटील आणि माऊली धुळगंडे यांची नियुक्ती केली आहे.गंभीर व महागड्या शस्त्रक्रिया करावयाच्या असलेल्या गोरगरीब गरजू रुग्णांना भरीव प्रमाणात अर्थ सहाय्य व्हाये याकरिता पंतप्रधान वैद्यकीय सहाय्यता निधी,मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी,तसेच अनेक ट्रस्टच्या माध्यमातून मदत मिळवून देण्याचे काम वंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून केले जाते.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रेरणेने डॉक्टर श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून गोरगरीब नागरिकांना मदत केली जाते,यातून अनेक गोरगरीब जनतेला याचा फायदा झाला आहे.बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून राज्यातील गोरगरीब आणि गरजवंत,आर्थिक दुर्लभ घटकातील रुग्णांना धर्मादाय रुग्णालयात राखीव बेड उपलब्ध करून देणे,निकषात बसत असलेल्या गरीब रुग्णांना पूर्ण मोफत किंवा सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया करण्यासंदर्भातील मदत करणे तसेच महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत नोंदणी असलेल्या रुग्णालयांमध्ये गरजू रुग्णांना मोफत शस्त्रक्रिया करण्यासाठी मदत शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून करण्यात येते.

# जोपर्यंत चंद्र सूर्य आहेत तोपर्यंत हा महाआनंद महोत्सव सोहळा चालेल - हभप प्रभाकर महाराज शास्त्री




**जालना । प्रतिनिधी -** अपवित्र भूमी पवित्र करून पावनभूमी निर्माण केली आणि जगाच्या कल्याणासाठी वै. हभप गुरुवर्य कृष्णाजी बाबा व्यवहारे यांनी आपले जीवन समर्पित केले, त्यांच्या प्रेरणेने ज्ञानेश्वर माऊली संजीवन सोहळ्या निमित्त हा महाआनंद महोत्सव सोहळा सुरू आहे हा महा आनंद महोत्सव सोहळा जोपर्यंत चंद्र सूर्य आहे तोपर्यंत चालेल असे प्रतिपादन भागवताचार्य हभप प्रभाकर महाराज शास्त्री यांनी श्रीमद् भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळ्याप्रसंगी केले.

बदनापूर तालुक्यातील सायगाव डोंगरगाव येथील श्रीक्षेत्र पावनधाम आश्रम येथे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांच्या संजीवन सोहळ्यानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहातील भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळ्यात ते बोलत होते पुढे बोलताना महाराज म्हणाले की श्रीकृष्ण येत असतो आपणाला राधा व्हावे लागते, राधा राणीची भक्ती कृष्णाची होती तशी भक्ती आपण करावी तेव्हा आपल्याला भगवंतही भेटतील श्रीराम येतील परंतु आपणाला शबरी बनाने लागेल ज्या ठिकाणी साधू आहेत तेथे देवा येतो, साधू असतो तेथे विवेक असतो, व्यवहारे बाबांनी या ठिकाणी अध्यात्मिक तप केले त्यामुळेच हे पवित्र पावनधाम झाले, जेथे वाणी थांबते तेथे आनंद असतो जेथे देव आहे तेथे आनंद आहे, परंतु संसार हा आनंद विरहित आहे ज्याच्या जीवनात देव आले त्याला चिंता राहत नाही, देवाला पाहिल्या शिवाय जीवनातील दुःख थांबू शकत नाही, जीवनातील दुःख बाजूला सारण्यासाठी श्रीमद् भागवत कथा आहे, श्रीभागवत कथा ऐकल्याने जीवनातील व्यथा निघून जाते, देवाला धन दौलत आवडत नाही, परंतु एक चित्ताने त्याचे नामस्मरण केलेले आवडते, संसार माणसाला देवाजवळ येऊ देत नाही, ज्याला संसार दिसला त्याला देव दिसत नाही, ज्याला देव दिसला त्याला संसार दिसत नाही, परंतु खऱ्या भक्ताला देव संसारच करू देत नाही, ज्याचे अंतकरण शुद्ध आहे त्याला देव प्राप्त होतो, शुद्ध अंतकरणाने देवाकडे गेलेला राक्षस वृत्तीच्या माणसाचेही कल्याण होते असे हभप प्रभाकर महाराज शास्त्री यांनी बोलतांना सांगितले यावेळी धर्मपिठावर हभप रामेश्वर महाराज शास्त्री, उद्धव महाराज घनगाव, शिवाजी महाराज शिंदे, कथेची संगीत साथ संगत आकाश महाराज सुरडकर, सचिन महाराज राठोड, अभिषेक महाराज जाधव, सुनील महाराज डेंगळे, शंकर महाराज बावस्कर यांची होती.

# राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर पदके मिळवून दिव्यांगांनी देशाचे नाव उज्वल केले -शल्यचिकित्सक डॉ. पाटील

**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध क्रीडा स्पर्धा व क्षेत्रात पदके मिळवून दिव्यांगांनी देशाचं नावलौकिक केलं ही बाब अत्यंत अभिमानास्पद असल्याचे जालना जिल्हा सामान्य रुग्णालयाचे शल्य चिकित्सक डॉ.राजेंद्र पाटील म्हणाले. जागतिक दिव्यांग दिनानिमित्त सक्षम पालक संघ व समदृष्टी क्षमता विकास अनुसंधान मंडळ यांच्या वतीने शहरातील संभाजीनगर भागातील शांतिनिकेतन विद्यामंदिर या शाळेत आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, डॉ. अरविंद नाईक, प्रा.डॉ.सुरेश कांगणे, डॉ. अशोक सिनगारे, डॉ.राजेंद्र कदम, मनीषा गायकवाड, नागेश पिंपरकर, विनोद कुमावत, रविकांत जगधने यांच्यासह कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक व आयोजक डॉ.निकेश मदारे यांची उपस्थिती होती.



या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू आदित्य घुले यांच्यासह सतीश वाघ, बळीराम तिडके, खुशी वाघमारे, शिवकन्या शेरकर, ऋतुजा सोरमारे आदींचा सत्कार करुन त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी पुढे बोलताना डॉ.पाटील पुढे म्हणाले की, समाजाने दिव्यांगाकडे अत्यंत डोळसपणे पहावे. अनेक जन दिव्यांग असूनही वेगवेगळ्या क्षेत्रात यश मिळवत आहेत. त्यांच्या अंगी असणारी जिद्द जीवनाकडे पाहण्याची त्यांची सकारात्मक भावना ही अत्यंत महत्त्वाची आहे. दिव्यांगास प्रत्येकाने सहकार्य करावे, त्यांना कमी लेखू नये. त्यांची कुठेही अवहेलना होणार नाही याची सर्वांनी काळजी घ्यावी. आज राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर दिव्यांगांनी विविध स्पर्धांमध्ये पदक मिळवून दिली. देशाचा नावलौकिक केला. जालना शहरातील आदित्य घुले या विद्यार्थ्यांनीही आंतरराष्ट्रीय पातळीवर बुद्धिबळ स्पर्धेत यश मिळवुन जिल्ह्याचे नावलौकिक केले याबद्दल त्याचे कौतुक करावे तेवढे कमी असल्याचे ते म्हणाले. जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या वतीने दिव्यांगाच्या मदतीसाठी सदैव तत्पर असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले दिव्यांगांनी वेगवेगळ्या शासकीय योजनांचाही लाभ मोठ्या प्रमाणात घ्यावा असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाचे मुख्यमार्गदर्शक व आयोजक डॉ.निकेश मदारे यावेळी बोलताना म्हणाले की, दिव्यांग म्हणून जन्माला येणे दिव्यांगांच्या हातात नाही. आम्हा दिव्यांगांना डोळ्यांनी हे जग दिसत नसलं तरी आम्ही ते मनाने अनुभवतो. समाजात दिव्यांग जणांना सन्मानाने वागवले जावे. आम्हाला कमी अगर जास्त लेखू नका तर आम्हाला तुमच्या सोबत घेऊन चला असे ते म्हणाले. दिव्यांगांच्या सत्काराचे आयोजन करून त्यांना प्रोत्साहन देण्याचे कार्य त्या अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगून ते म्हणाले की, दिव्यांग व्यक्तीही समाजासाठी देशासाठी तुमच्याबरोबर काम करू शकते फक्त आम्हाला संधी देऊन सोबत घेण्याचे आवाहन केले. दिव्यांग व्यक्तीच्या मातापित्यांना अत्यंत त्रास सहन करावा लागतो त्यांनाही समाजाने सहकार्य करावे. असे आवाहन त्यांनी केले.

माणसाचे शरीर दुर्बल असले तरी मन खंबीर असले पाहिजे- जिल्हाप्रमुख अंबेकर यावेळी कार्यक्रमास आवर्जून उपस्थित असलेले शांतिनिकेतन विद्यामंदिर शाळेचे अध्यक्ष तथा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर उपस्थित विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, माणसाचे शरीर दुर्बल असले तरी मन खंबीर असले पाहिजे. तीव्र इच्छाशक्तीच्या बळावर दिव्यांगही कोणत्याही क्षेत्रात यश मिळवत आहेत. शारीरिक कमजोरीपेक्षा मानसिक कमजोरी हानिकारक असते. निसर्गाने दिव्यांगावर अन्याय केला असला तरी ते मनाने खंबीर असल्याने समाजात सर्व क्षेत्रात टिकून पुढे मार्गक्रमण करीत आहेत. शरीर चांगले असतानाही मनाने कमजोर असणारे अनेक जन आत्महत्या करताना दिसतात पण शरीर चांगले नसतानाही दिव्यांग त्यावर मात करून चांगले जीवन जगत असताना आढळतात. दिव्यांग असूनही कष्ट करण्याची उमेद पाहिल्यास आपना सर्वांसाठी ते आदर्श ठरतात. तर दुसरीकडे शरीराने धडधाकट असणारे मात्र चौका-चौकात निष्क्रियपणे बसून वायफळ गप्पात वेळ घालवणारे व्यसनाधीनतेकडे वळणारेच खर्या अर्थाने दिव्यांग असल्याचे ते म्हणाले. दिव्यांग बांधव संघटन करून स्वतः बरोबरच इतरांनाही मदत करतात हे खरोखरच उल्लेखनीय असल्याचे जिल्हाप्रमुख अंबेकर म्हणाले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर गाढवे, मुख्याध्यापिका प्रेमला पंडित, सहशिक्षक सूर्यकांत बेले, अशोक माधवले, अंबादास घायाळ, मोहन भदाडे, सुनीता खरात, पल्लवी खरात, किर्ती खैरे, सीमा इंगळे, विद्या चौधरी, कांचन वाघ, संदीप वाखारकर, तुकाराम चव्हाण व शिक्षक वृंद आदींची परिश्रम घेतले.

# ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक सखाराम बापू फदाट यांचे निधन; शासकीय ईतमामात अंत्यसंस्कार

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** जाफ्राबाद तालुक्यातील बोरगाव बुद्रुक येथील ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक सखाराम बापू फदाट यांचं अल्पशा आजाराने निधन झाले आहे.१ डिसेंबर रोजी रात्री ११ वाजता सखाराम बापू फदाट यांनी अखेरचा श्वास घेतला.मृत्यूसमयी ते ९५ वर्षांचे होते. जाफ्राबाद तालुक्यातील बोरगाव बुद्रुक या त्यांच्या गावी त्यांच्यावर शासकीय ईतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.सखाराम फदाट हे बापू या टोपण नावाने अवघ्या जाफ्राबाद तालुक्यात परिचीत होते.छत्रपती संभाजीनगर जिल्हा असताना सखाराम बापू हे छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे सदस्य होते.जाफ्राबाद पंचायत समितीचे सभापतीपदही त्यांनी भूषवलेले आहे.सलग ४० वर्ष ते बोरगाव गावचे सरपंच म्हणून कार्यरत होते. सखाराम बापू तरुण वयातच निजाम शासनाविरुद्धच्या लढ्यात सक्रिय झाले.बापूंच्या हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील योगदानाची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने त्यांचा स्वातंत्र्य सैनिक सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव केला.सखाराम बापू यांच्या निधनामुळे बोरगाव परीसरात शोककळा पसरली आहे.बापूंच्या पार्थिवावर बोरगाव फदाट येथे शासकीय ईतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी तहसीलदार सारीका भगत,पोलीस निरीक्षक प्रताप इंगळे यांच्यासह राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. बापू त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातवंडे असा मोठा परीवार आहे.



# सुखलालजी कुंकलोळ यांचे निधन

**जालना -** येथील प्रतिष्ठीत तथा ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी सुखलालजी फत्तेलालजी कुंकलोळ (जैन) यांचे आज संथारा निधन झाले. ते ८९ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, कचरुलाल व कुशल ही दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.



ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी सुखलालजी कुंकलोळ (जैन) यांच्या निधनाचे वृत्त कळताच जिल्हाधिकारी कार्यालयातील रिता मेत्रेवार आणि तहसीलदार छाया पवार यांनी त्यांच्या निवासस्थानी येऊन त्यांना श्रध्दांजली अर्पण केली. श्री. सुखलालजी जैन यांनी स्वातंत्र्य सैनिक, श्री स्थानकवासी जैन श्रावक संघ, गुरु गणेश अंध विद्यालय. भारत स्काऊट गाईड, रेड स्वस्तिक सोसायटीसह अनेक पदावर पदाधिकारी राहिलेल्या सुखलालजी जैन समाजाचे मोठे योगदान राहिलेले आहे. आज मंगळवारी सकाळी ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी सुखलालजी कुंकलोळ (जैन) यांची अंत्ययात्रा निघाली त्यावेळी राजकीय, पत्रकार, वकील, डॉक्टरांसह विविध स्तरातील नामवंताबरोबरच सामान्य नागरीकांची देखील मोठी उपस्थिती होती. श्री. सुखलालजी जैन यांच्या निधनाबद्दल सर्वस्तरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# महापरिनिर्वाण दिनी प्रख्यात विचारवंत डॉ.सोनकांबळे यांचे जालन्यात व्याख्यान

**जालना । प्रतिनिधी** - भारतीय संविधानाचा अमृतमहोत्सव, संविधान गौरव दिन, महात्मा जोतिबा फुले स्मृतिदिन व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जालना शहरातील संविधान जनजागृती संघातर्फे शुक्रवारी ६ डिसेंबर रोजी जालना शहरात छत्रपती संभाजीनगर येथील फुले- शाहू- आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक व लेखक प्रा. डॉ. ह. नि. सोनकांबळे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

जालना शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात शुक्रवारी सांयकाळी ५ वाजता ' भारतीय संविधान: लोकशाहीची सद्य:स्थिती आणि भवितव्य' या विषयावर प्रा. डॉ. सोनकांबळे यांचे व्याख्यान होणार आहे. उद्घाटक म्हणून जालना जिल्हा परिषदेचे माजी सभापती सुदामराव सदाशिवे हे यावेळी उपस्थित राहणार आहेत.

कामगार चळवळीचे नेते कॉ. अण्णा सावंत हे अध्यक्षस्थानी राहणार आहेत तर जिल्हा सामान्य रुग्णालयाचे अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र गाडेकर यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे.

या व्याख्यानास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे,असे आवाहन संविधान जनजागृती संघाचे अध्यक्ष दादाराव हिवाळे, उपाध्यक्ष मिलिंद धनेधर, सचिव प्रकाश गडवे, सहसचिव केशव पगारे, कार्याध्यक्ष सदानंद टवले, कोषाध्यक्ष शंकर भालेराव आदींनी केले आहे.




